अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई - ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :- ०५.०७.२०२२

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट

फिर्यादी यांना त्यांच्या दुकानालगत पावसाळी शेड बांधण्यासाठी परवानगी देण्याकरीता, यातील आलोसे क्र. १ व २ यांनी लाचेची मागणी करुन पडताळणी दरम्यान तडजोडीअंती आलोसे क्र. २ यांनी स्वत:करीता व आलोसे क्र. १ यांचेकरीता लाचेची रक्कम स्विकारली. त्यास आलोसे क्र. १ यांनी सहमती दर्शविल्याने दोघांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | ३१/२०२२ |
| ३ | कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| ४ | आरोपीचे नांव कार्यालयाचा पत्ता | १. लोकसेवक श्री. अमोल चंद्रकांत थवील, वय ३९ वर्षे, पद - सहाय्यक अभियंता,<br>२. लोकसेवक श्री. दत्तात्रेय संभाजी माने, वय ३६ वर्षे,, पद - दुय्यम अभियंता,<br>दोन्हीही : कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, इमारत व कारखाने विभाग, डी विभाग बृहन्मुंबई म.न.पा कार्यालय, जोबनपुत्र कंम्पाऊड, नाना चौक, मुंबई ०७ |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये २,००,०००/- |
| ६ | तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये १,९०,,०००/- (अक्षरी रुपये एक लाख नव्वद हजार) |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | रुपये १,९०,०००/- |
| ८ | थोडक्यात हकीगत | यातील फिर्यादी यांचे ऑटोमोबाईल स्पेअर पार्टचे स्वत:चे दुकान आहे. दुकानाच्या पाठीमागे सोसायटीच्या सामाईक जागेमध्ये दुकानालगत पावसाळी शेड बांधण्यासाठी परवानगी देण्याकरीता लोकसेवक क्र. २ यांनी फिर्यादी यांच्याकडे रुपये २,००,०००/- इतक्या लाचेची मागणी केली. फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २१/०६/२०२२ रोजी या कार्यालयात प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br><br>दिनांक ०१/०७/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान यातील फिर्यादी यांनी पंच क्र. १ यांचे समवेत आलोसे क्र. १ व २ यांचे कार्यालयात भेट घेतली असता, यातील आलोसे क्र. १ व २ यांनी फिर्यादी यांचेकडे दुकानाच्या पाठीमागे सोसायटीच्या सामाईक जागेमध्ये दुकानालगत पावसाळी शेड बांधण्यासाठी परवानगी देण्याकरीता रुपये २,००,०००/- इतक्या लाचेची मागणी केली. फिर्यादी यांच्या विनंतीवरुन तडजोडीअंती रुपये १,९०,०००/- इतक्या लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले.<br><br>त्यानंतर आज दिनांक. ०४/०७/२०२२ रोजी फिर्यादी हे पंच क्र. १ यांचे समवेत लोकसेवक यांनी मागणी केल्याप्रमाणे रुपये १,९०,०००/- इतकी रोख रक्कम घेवुन लोकसेवक यांचे कार्यालयात त्यांची भेट घेण्यास गेले असता, करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान प्रथम लोकसेवक क्र. २ यांनी फिर्यादी यांच्याकडुन लाचेची रक्कम रु. १,९०,०००/- इतकी स्विकारल्यावरुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले. तद्नंतर लोकसेवक क्र. २ यांच्या मोबाईलवरुन लोकसेवक क्र. १ यांना त्यांनी लाच घेतल्याचे कळविले असता, त्यांनी त्याबाबत सहमती दर्शविली. तसेच लोकसेवक क्र. १ हे त्यांच्या कार्यालयामध्ये आल्यानंतर फिर्यादी यांनी पंच क्र. १ यांच्या समक्ष त्यांची भेट घेतली असता, त्यांनी लाचेची रक्कम लोकसेवक क्र. २ यांनी त्या दोघांच्यावतीने स्विकारले बाबत सहमती दर्शविल्याने आलोसे क्र. १ यांस देखिल ताब्यात घेण्यात आले. म्हणून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.<br><br>नमुद सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. १ यांच्या दालनाची दोन पंचासमक्ष झडती घेतली असता, त्यांच्या टेबलाचे डाव्या बाजूकडील ड्रॉव्हरमध्ये रुपये १७,६४,५००/- (अक्षरी रुपये सतरा लाख चौसष्ट हजार पाचशे) इतकी रोख रक्कम मिळुन आली. सदरबाबत त्यांनी कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण न दिल्याने सदरची रक्कम पुढील तपासाकामी ताब्यात घेण्यात आली आहे. |

मार्गदर्शन अधिकारी - श्री. विजय पाटील सो., अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी,मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८,
वेबसाईट : acbmaharashtra.gov.in, ईमेल acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल : addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक : :facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईल ॲप : www.acbmaharashtra.net

05/07/22

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

Scanned with CamScann